| | | |
|---|---|---|
| | पोलीस अधिक्षक कार्यालय,नागपूर जिल्हा(ग्रामीण),<br>नागपूर पोलीस भवन,वेस्ट हायकोर्ट रोड, नागपूर<br>**Office of The Superintendent Of Police,Nagpur District (Rural), Nagpur**<br>Tel No: - 0712-2566650, E-mail:-sp.nagpur.r@mahapolice.gov.in | |

## नागपूर पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा ग्रामीण पोलीस शिपाई भरती सन 2024–25

## उमेदवारांकरीता सुचना

पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा ग्रामीण पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती सन 2024–25 मध्ये 272 पोलीस शिपाई यांचे रिक्त पदाकरीता पात्र असलेल्या उमेदवारांची दिनांक 15/03/2026 रोजी लेखी परिक्षा घेण्यात आली आहे. लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांची तात्पुरती यादी यासोबत जोडून पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा ग्रामीण, नागपूर दलाच्या अधिकृत संकेतस्थळ https://nagpurgraminpolice.gov.in यावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

तरी उमेदवारांना सदर बाबत कोणत्याही प्रकारचे आक्षेप असल्यास दिनांक 20/03/2026 रोजीचे दुपारी वेळ 2:00 वाजेपर्यत sp.nagpur.r@mahapolice.gov.in या इमेलवर पाठवावे. यानंतर कोणतेही आक्षेप स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

टिप :–

1) A,B,C,D,सेट मधील प्रश्न ( 43,18,18,18 ) :– एक घडयाळ सकाळी 5 वाजता बरोबर वेळेनुसार लावलेले आहे. घडयाळ 24 तास 16 मिनिटे मागे पडते. जेव्हा घडयाळ, चवथ्या दिवशी रात्री 10 ची वेळ दाखवेल तेव्हा प्रत्यक्षात किती वाजलेले असतील.?

2) A,B,C,D,सेट मधील प्रश्न (55,30,80,55) :– सूत या शव्दाचा विरूध्द लिंगी शब्द कोणता?

3) A,B,C,D,सेट मधील प्रश्न (72,47,97,72 ) :– प्रनः– चित + आनंद या विग्रहापासुन बनलेला योग्य सामासिक शब्द ओळखा.

उपरोक्त A,B,C,D, या चारही सेट मधील उपरोक्त अ.क्र. 1, 2 व 3 मधील प्रश्न हे व्याकरणातील चुक तसेच टंकलेखनात चुक झाल्यामुळे उद्‌भवले आहे. करिता परिक्षेस बसणा–या सर्व उमेदवारांना या तिन्ही प्रश्नावर सरळ सरळ प्रत्येकी 1 गुण देण्यात आला आहे.

4) तसेच प्रश्न संच A,B,C,D, या चारही सेट मधील ( प्रश्न क्र. 32, 07, 07, 07 ) या गणिताच्या प्रश्नाचे उत्तर ( Option ) A व D हे दोन्ही बरोबर असल्याने ज्या उमेदवारांनी ( Option ) A किंवा D दिले आहे त्यांना या प्रश्नाचा गुण देण्यात आला आहे

( हर्ष ए. पोद्दार ) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर.